# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक: रानिआ/मनपा-२०१५/प्र.क्र. २४/का-५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १८ मार्च, २०२०

प्रति,
१) जिल्हाधिकारी (सर्व),
(मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हे वगळून).
२) महानगरपालिका आयुक्त (सर्व),

विषय:- महानगरपालिका सार्वत्रिक / पोटनिवडणूक
उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे
बंधनकारक केल्याच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत...

संदर्भ:- १) राज्य निवडणूक आयोगाचे परिपत्रक क्र. रानिआ/गापंनि-२०१४/प्र.क्र.२/का-८ दि. ७.१.२०१५.
२) नगर विकास विभागाचे क्र. एमसीओ-२०१९/प्र.क्र.१५३ (भाग-१)/नवि-१४, दि.१३ मार्च, २०२० रोजीचे पत्र.

महोदय,

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ५ब मधील तरतूदीनुसार उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबत जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. मात्र नामनिर्देशनपत्रासोबत जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यास शासनाने वेळोवेळी सवलत दिली होती, त्यानुसार सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ द्वारे केलेल्या सुधारणेनुसार ही सवलत दि.३० जून, २०१९ पर्यंत लागू होती. दिनांक २२ ऑगस्ट, २०१९ च्या अध्यादेशानुसार या सवलतीची मुदत दि.३० जून, २०२० पर्यंत वाढविली होती. मात्र सदर अध्यादेशाचे रुपांतर अधिनियमात झालेले नाही. त्यामुळे आता उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक झाले आहे.

राखीव जागांवरून निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असल्यामुळे उमेदवारांनी त्यांची जात वैधता प्रमाणपत्रे वेळीच काढून घेणे

आवश्यक आहे. या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाने दि.०७ जानेवारी, २०१५ च्या परिपत्रकान्वये सविस्तर सूचना दिल्या असून त्यानुसार योग्य ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

सन २०२० मध्ये नवी मुंबई, औरंगाबाद, वसई- विरार, कल्याण- डोंबिवली व कोल्हापूर या पाच महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत. या निवडणूकांच्या अनुषंगाने खालील कार्यवाही तात्काळ करावी.

१. राखीव जागांवरून निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असल्यामुळे उमेदवारांनी त्यांची जात वैधता प्रमाणपत्रे वेळीच काढून घेणेबाबत योग्य ती प्रसिध्दी दयावी.
२. अशा इच्छुक उमेदवारांचे अर्ज आल्यास ते तात्काळ जात पडताळणी समितीकडे पाठविण्यात यावेत.
३. संबंधित जिल्हाधिकारी यांनी जात पडताळणी समितीशी योग्य तो समन्वय साधून इच्छुक उमेदवारांच्या अर्जामध्ये काही उणीवा आढळून आल्यास त्याची माहीती संबंधित उमेदवारास देऊन त्याची त्वरीत पूर्तता केली जाईल याची दक्षता घ्यावी जेणेकरून जात वैधताप्रमाणपत्रा अभावी एकही पात्र इच्छुक उमेदवार वंचित रहाणार नाही.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार

आपला,

(अ. तु. सणस)
उपायुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र